



दैनिक **अक्षराज**

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com



खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...

कृपया इथे स्कॅन करा

Plz Scan Here



वर्ष : ०६ | अंक : ७०, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.२३ ऑक्टोबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# राज ठाकरेंकडून मोदी सरकार कोसळण्याचा अंदाज !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२२, नागपूर :** पुढील तीन ते चार महिन्यांत देशात मोठ्या राजकीय घडामोडी घडतील, सत्तांतर होईल आणि काही काळासाठी देशाला पंतप्रधान नसेल, असा दावा मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी नुकताच केला. या पार्श्वभूमीवर भाजप नेते आणि राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांना टोला लगावला आहे. 'दिवाळी आली की फटाके फुटतात. त्यामुळे दिवाळीचा एक फटाका फुटला, असे समजा,' अशा शब्दांत बावनकुळे यांनी राज ठाकरेंच्या विधानाची खिल्ली उडवली.

राज ठाकरे यांनी सोशल मीडियावर शेअर केलेल्या 'फ्रेंडशिप फाईल्स' या डॉक्युमेंटरीच्या मुद्द्यावर बावनकुळे म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी गेल्या २५ वर्षांपासून सार्वजनिक जीवनात आहेत. देशाचा आणि राज्याचा विकास करायचा असेल, तर उद्योग-व्यवसाय क्षेत्राची भूमिका महत्त्वाची असते. उद्योगपतींच्या समस्या समजून घेण्यासाठी त्यांच्यासोबत बैठका कराव्या लागतात. मात्र, अशा बैठकांवरून उद्योगपतींना मदत केली जाते किंवा त्यांच्याशी जवळचे संबंध असल्याचे निष्कर्ष काढणे चुकीचे आहे, देशाच्या विकासासाठी उद्योगपतींना सोबत घेणे आवश्यक आहे. उद्योग-व्यवसाय क्षेत्राशिवाय विकासाची प्रक्रिया पूर्ण होऊ शकत नाही. त्यामुळे अशा प्रकारच्या फाईल्सच्या माध्यमातून अदानी-अंबानी यांच्याशी संबंध असल्याचा मुद्दा उपस्थित करून नकारात्मक वातावरण निर्माण करणे योग्य नाही, असेही बावनकुळे म्हणाले.

बावनकुळे पुढे म्हणाले की, ६५ वर्षे सरकार काँग्रेसचे होते, त्यावेळी किती वेळ बसून फाईल्स मंजूर केल्या? त्यामुळे अशा प्रकारची निगेटिव्हिटी तयार करून, केंद्रातून पंधरा वर्षे सत्तेतून बाहेर असल्याने जनतेच्या मनात संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात




आहे. त्यामुळे नवीन नियम ठरवत असताना उद्योगपतींना सोबत घ्यावे लागते आणि उद्योगपती असल्याशिवाय डेव्हलपमेंट होत नाही. मात्र, आता केंद्रातील सत्तेपासून १५ वर्षे दूर राहिल्याने जनतेच्या मनात संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.

मनोज जरांगे यांनी ५०० कोटी रुपयांच्या केलेल्या आरोपांबाबत विचारले असता, बावनकुळे यांनी चौकशीची भूमिका मांडली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यापूर्वीच या प्रकरणाच्या चौकशीबाबत भूमिका स्पष्ट केली आहे. मला मनोज जरांगे यांच्याबद्दल काही बोलायचे नाही. त्यांना जे बोलायचे आहे, ते बोलण्यास ते मोकळे आहेत. मात्र, त्यांनी सरकारकडे रीतसर तक्रार केली असेल, तर संबंधित यंत्रणांकडून चौकशी केली जाईल, तसेच तक्रार कोणत्या पोलीस ठाण्यात किंवा जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे, हे तपासणे आवश्यक असून, तक्रार प्राप्त झाल्यानंतर मुख्यमंत्री किंवा संबंधित यंत्रणा पुढील कार्यवाही करतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

अल्बेनियातील सर्वोच्च न्यायालयाला आग लावण्यात आल्याच्या घटनेच्या संदर्भात संजय राऊत यांनी केलेल्या विधानावर बावनकुळे यांनी तीव्र आक्षेप घेतला. अशा घटनांमधून समाजाने काय शिकावे, असा प्रश्न उपस्थित करत त्यांनी राऊत यांच्या भूमिकेवर टीका केली. भारतात अशा प्रकारची घटना घडावी, असा अर्थ निघत असेल, तर ते गंभीर आहे. भारताची लोकशाही आणि संविधान कमकुवत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानाच्या आधारावर देश चालतो. त्यामुळे परदेशातील अशा घटनांचा संदर्भ देऊन देशात अस्थिरतेचे वातावरण निर्माण करणारी विधाने करू नयेत, असे बावनकुळे म्हणाले.

दरम्यान, रोहित पवार यांच्या पत्रकार परिषदेवर टीका करताना बावनकुळे यांनी त्याला 'नौटंकी' म्हणत सांगितलं की, महाराष्ट्रात अराजकता निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू असून, विरोधकांना राजकीयदृष्ट्या पुढे जाण्याची घाई झाली आहे, प्रेझेंटेशन आणि पत्रकार परिषदांच्या माध्यमातून लोकांमध्ये संभ्रम निर्माण करण्यापेक्षा दुष्काळग्रस्तांना मदत कशी मिळेल, विकासाची कामे कशी होतील आणि जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक कशी होईल, यावर विरोधकांनी लक्ष केंद्रित करावे. वारंवार अशा कार्यक्रमांद्वारे महाराष्ट्र आणि देशातील विकासाच्या मुद्द्यांवरून लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न होत असल्याचेही बावनकुळे यांनी म्हटले.

## ट्रक-कार दुचाकीच्या विचित्र अपघातात, महिलेचा मृत्यू तर पती किरकोळ जखमी



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२२, नागपूर :** खापरखेडा पोलीस स्टेशन हद्दीतील मुख्य बाजारपेठेत २२ ऑक्टोबर गुरुवारला सायंकाळच्या सुमारास एक विचित्र अपघात घडला. एका कारचालकाने दार उघडले असता त्याला दुचाकी धडकली दुचाकी चालक व त्याची पत्नी खाली पडली. यादरम्यान मागून येणाऱ्या ट्रकच्या समोरच्या चाकात महिला आल्यामूळे गंभीर जखमी झाली खाजगी रुग्णालयात उपचारा दरम्यान जखमी महिलेचा मृत्यू झाला असून खापरखेडा परिसरात सर्वत्र शोककळा पसरली आहे.

मृतक महिलेचे नाव शबनम सत्तार छवारे वय ४० वार्ड क्रमांक २ सोनार गल्ली मुख्य बाजारपेठ खापरखेडा असे आहे तर सत्तार इस्त्राईल छवारे वय ४३ असे किरकोळ जखमी झालेल्या पतीचे नाव आहे.

मृतक महिला शबनम छवारे ह्या एका सोसायटी मधून काम आटोपून पती सत्तार छवारे यांच्या सोबत दुचाकी क्रमांक एमएच-४०-टी-७५९४ ने आपल्या घराकडे जात होत्या. यादरम्यान मुख्य बाजारपेठेतील चेमरी गेट अलीकडे राष्ट्रीय महामार्गावर कार क्रमांक एमएच-४०-सीए-८४१३ च्या कार चालकाने रस्त्याच्या कडेला कार उभी केली यावेळी कारचे दार उघडले असता मागून येणारी दुचाकी कारच्या दाराला जाऊन धडकली.

या विचित्र अपघातात दुचाकी वरून मृतक शबनम छवारे व सत्तार छवारे खाली पडले याचवेळी मागून येणारा ट्रक क्रमांक एमएच-४०-सीडी-४०५० च्या समोरच्या चाकात मृतक शबनम छवारे आल्या. ट्रक चालकाने काही अंतरा पर्यंत शबनम यांना फरफटत नेल्याची माहिती आहे. सदर अपघातात शबनम गंभीर जखमी झाल्या तर त्यांचे पती सत्तार किरकोळ जखमी झाले.

यावेळी घटनास्थळी एकच गर्दी झाली, सदर घटनेची माहिती खापरखेडा पोलीसांना देण्यात आली नागपूर येथील मॅक्स या खाजगी रुग्णालयात शबनम यांना दाखल करण्यात आले. मात्र, उपचारा दरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

खापरखेडा पोलिसानी घटनास्थळ गाठून पंचनामा केला पोलिसानी कार, ट्रक, दुचाकी ताब्यात घेतली आहे. पोलिसानी गुन्ह्याची नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे.

## विसापुरात शेतकरी व शेतमजूरांचा सत्कार



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२२, विसापूर (चंद्रपूर) :** विसापूर येथील जनकिसान कृती समितीच्या वतीने स्थानिक हनुमान देवस्थान प्रांगणात कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शेतकरी व शेतमजुरांचा सत्कार समारंभ ति. २१ ऑक्टोबर २०२६ रोज बुधवारी पार पडला. यावेळी सत्कारमूर्तींना पुष्पगुच्छ, शाल व स्मृतीचिन्ह प्रदान करून मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ नेते व माजी जिल्हा परिषद सदस्य रामभाऊ टोंगे होते.

यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून आयोजक व जनकिसान कृती समितीचे अध्यक्ष नरेंद्र इटनकर, माजी सरपंच रिता जिलटे, सुरेखा इटनकर, सामाजिक कार्यकर्ते अक्षय देशमुख, सुरेश पंदीलवार, अर्चना पोतराजे, श्यामसुंदर भोयर, सुभाष हरणे, राजू लांडगे, योगेश निपुंगे, शंकर गिरडकर, दौलत चिकाटे यांची उपस्थिती होती.

दरम्यान, विसापूर येथील तेली समाजाचे अध्यक्ष तथा जनकिसान कृती समितीचे अध्यक्ष नरेंद्र इटनकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून त्यांचा केक कापून सन्मान केला. कार्यक्रमाचे अध्यक्ष रामभाऊ टोंगे, मंजुषा पावडे, कमला ताजने, अंकुश गिरडकर, जनार्दन पाटणकर, हरिदास टोमटे, उमाजी मशाखेत्री, लखन ताजने आदी शेतकरी तथा शेतमजूरांचा मान्यवरांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ व स्मृतीचिन्ह प्रदान करून शेतीच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन सत्कार करण्यात आला. यावेळी मान्यवरांनी मनोगतात सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले.

## दुष्काळमुक्तीचा अण्णा हजारेंचा 'राळेगण पॅटर्न' !

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२२, अहिल्यानगर :** राज्यात गंभीर दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर राळेगण सिद्धी या गावासाठी विशेष दुष्काळ निवारण आराखडा तयार करण्यात आला आहे. तात्पुरत्या उपायांऐवजी संपूर्ण गावाला केंद्रस्थानी ठेवून नियोजनबद्ध पद्धतीने दुष्काळाचा सामना करण्याची दुष्काळाची ही संकल्पना आहे. इतर सामाजिक संस्था आणि दानशूर व्यक्तींनीही असा पुढाकार घ्यावा, असे आवाहन ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी केले.

गावातील स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधी ट्रस्टच्या बैठकीत ते बोलत होते. जनावरांच्या चाऱ्याच्या खर्चात गावाचा ५० टक्के सहभाग, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, जनावरांची संख्या आणि जलस्रोतांबाबत झालेल्या बैठकीत चर्चा करण्यात आली. आता विशेष ग्रामसभा बोलावून त्यात सविस्तर चर्चा केली जाणार आहे. राळेगण सिद्धीने जलसंधारणाच्या क्षेत्रात देशासमोर आदर्श निर्माण केला आहे. या संकटावरही गावकरी एकजुटीने मात करतील. प्रत्येक नागरिकाला पाणी बचतीची शपथ दिली जाणार आहे.

> **"दुष्काळावर मात करण्यासाठी राळेगणसिद्धी गावाने वॉटर बजेट आराखडा तयार केलाय. या आराखड्यानुसार गावातील एकही जनावर विकले जाणार नाही. गावातील सर्व पशुधनाची अचूक गणना केली जात आहे. पुढील पावसाळ्यापर्यंत प्रत्येक जनावराला पुरेसा चारा आणि पाणी उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे.**
>
> **गावच्या लोकसंख्येनुसार प्रत्येक ग्रामस्थाला दररोज किती पाणी लागते, याचा ताळेबंद तयार करण्यात आला आहे. पाण्याचा अपव्यय पूर्णपणे रोखून समन्यायी पद्धतीने वाटप केले जाणार आहे. माणसे आणि जनावरांच्या पाण्याची एकत्रित गरज लक्षात घेऊन विहीर व कूपनलिकांमधून गरजेपुरताच उपसा केला जाणार आहे. असा हा आराखडा आहे.**

हा लढा एकट्याचा नसून संपूर्ण राळेगण परिवाराचा आहे, असे अण्णा हजारे यांनी सांगितले आहे. ज्येष्ठ समाजसेवक




अण्णा हजारे यांना सामाजिक कार्यासाठी देश- विदेशांतून अनेक पुरस्कार मिळाले आहेत. याच पुरस्कारांच्या रकमेतून मिळणाऱ्या व्याजातून दरवर्षी आदर्श व्यक्तींना 'अण्णा हजारे सामाजिक गौरव पुरस्कार' दिले जातात. मात्र, यंदा दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन पुरस्कारांसाठी खर्च होणारी रक्कम दुष्काळ निवारणासाठी वापरण्याचा संकल्प हजारे यांनी केले आहे. यंदाच्या पुरस्कारांवर होणारा सुमारे २० लाख रुपयांचा खर्च हा दुष्काळ निवारणासाठी वापरण्यात येणार असल्याचं त्यांनी सांगितलं असून इतर सामाजिक संस्थांनीही राज्यातील दुष्काळासंबंधी असे निर्णय घ्यावेत, असे आवाहन त्यांनी केलं आहे.

## चंद्रपूर दुष्काळी परिस्थिती : खा प्रतिभा धानोरकर यांची केंद्राकडे विशेष आर्थिक पॅकेजची मागणी



PRATIBHA SURESH DHANORKAR
Member of Parliament
13-Chandrapur-Wani-Arni Loksabha Constituency

Member : Coal Mines & Steel Standing Committee
Member : Committee on Welfare of OBC
Member : Advisory Committee, Road Transport & Highways Ministry.

Letter No :- 2470/2026
Date : 21/10/2026

प्रति,
मा. शिवराज सिंह चोहान जी,
केंद्रीय कृषि एवं किसान कल्याण मंत्री,
भारत सरकार, नई दिल्ली.

विषय : चंद्रपुर जिले सहित संपूर्ण महाराष्ट्र में गंभीर सूखाग्रस्त स्थिति के संबंध में विशेष आर्थिक पैकेज स्वीकृत करने एवं केंद्रीय निरीक्षण टीम भेजने हेतु।

महोदय,

उपरोक्त विषय के संधर्भ मे, मैं इस पत्र के माध्यम से चंद्रपुर संसदीय क्षेत्र सहित संपूर्ण महाराष्ट्र के किसानों पर आए गंभीर सूखे के संकट की ओर आपका ध्यान आकर्षित करना चाहती हूँ। इस वर्ष अनियमित, अपर्याप्त और असमायिक वर्षा के कारण चंद्रपुर जिले सहित राज्य के अधिकांश हिस्सों में फसलों का भारी नुकसान हुआ है तथा तैयार फसलें पूरी तरह सूख गई हैं। इस भीषण स्थिति के कारण खेती में लगाई गई लागत निकलना भी असंभव हो गया है, जिससे संपूर्ण महाराष्ट्र का किसान अत्यंत हताश और बड़े आर्थिक संकट में फँस गया है।

चंद्रपुर जिले और शेष महाराष्ट्र में स्थानीय स्तर पर पीने के पानी की किल्लत, मवेशियों के लिए चारे की कमी तथा खेत मजदूरों के लिए रोजगार का गंभीर संकट पैदा हो गया है। सूखे की यह भीषण छाया केवल एक क्षेत्र तक सीमित न रहकर पूरे राज्य को अपनी चपेट में ले चुकी है, जिससे ग्रामीण क्षेत्रों के किसानों और आम नागरिकों का मनोबल पूरी तरह टूट चुका है।

इस आपातकालीन और गंभीर स्थिति से किसानों को बाहर निकालने के लिए केंद्र सरकार का तुरंत हस्तक्षेप करना और महाराष्ट्र के लिए विशेष आर्थिक पैकेज की घोषणा करना अत्यंत आवश्यक है। इस पैकेज के माध्यम से प्रभावित किसानों को प्रत्यक्ष वित्तीय सहायता, कर्ज माफी, बीज व उर्वरकों पर सब्सिडी तथा फसल नुकसान का तत्काल मुआवजा देकर उन्हें पुनः राहत पहुँचाना संभव हो सकेगा।

इसके साथ ही, चंद्रपुर जिले सहित महाराष्ट्र में सूखे की वास्तविक तीव्रता और नुकसान का सटीक आकलन करने के लिए केंद्र सरकार तुरंत वरिष्ठ अधिकारियों और विशेषज्ञों की एक विशेष निरीक्षण टीम महाराष्ट्र भेजे। महाराष्ट्र का किसान देश का मुख्य आधार स्तंभ है, अतः इस कठिन समय में केंद्र सरकार सकारात्मक निर्णय लेकर किसानों को शीघ्र बड़ा दिलासा दे, यही नम्र प्रार्थना है।

भवदीया,
Smt PRATIBHA SURESH DHANORKAR
MEMBER OF PARLIAMENT
LOKSABHA
DELHI

WARORA : "Suryakiran-1" Abhyankar Ward, Laxmi Nagar, WARORA-442 907 Dist.- Chandrapur (Maha) Tel.- (07176)280586
CHANDRAPUR : "Suryakiran-2" Akashwani Road, Near Zilla Stadium, CHANDRAPUR - 442 401 Dist.- Chandrapur (Maha)
WANI : "Suryakiran-3" Behind Sai Darbar, Near Sidhhivinayak Hall, Warora Road, WANI-445 304 Dist.- Yavatmal (Maha)

Email : pratibhadhanorkar0006@gmail.com / Mob. 9403321628

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२२, चंद्रपूर :** चंद्रपूर दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन खासदार प्रतिभा धानोरकर यांनी केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांना पत्र लिहिले आहे. महाराष्ट्रासाठी विशेष आर्थिक पॅकेज जाहीर करावे, अशी मागणी त्यांनी केली. पत्रात नमूद केल्यानुसार, अनियमित पावसामुळे पिकांचे नुकसान झाले आहे. काही भागांत पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या चाऱ्याची टंचाई जाणवत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. नुकसानीच्या मुल्यांकनासाठी केंद्रीय पाहणी पथक पाठवावे, अशीही




त्यांची मागणी आहे.

चालू वर्षात अनियमित, अपुरा आणि अवकाळी पावसामुळे चंद्रपूर जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात गंभीर दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून, शेतकरी प्रचंड आर्थिक संकटात सापडला आहे. या पार्श्वभूमवर चंद्रपूरच्या खासदार प्रतिभा धानोरकर यानी केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांना पत्र लिहून राज्यातील भीषण परिस्थितीकडे केंद्र सरकारचे तातडीने लक्ष वेधले आहे. तसेच परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन केंद्र सरकारने महाराष्ट्रासाठी तातडीने विशेष आर्थिक पॅकेज जाहीर करावे आणि पाहणीसाठी केंद्रीय पथक पाठवावे, अशी आग्रही मागणी त्यांनी केली आहे.

पावसाच्या अनियमिततेमुळे चंद्रपूर जिल्ह्यासह राज्यातील बहुतांश भागात पिकांचे अतोनात नुकसान झाले असून उभी पिके पूर्णपणे वाळली आहेत. यामुळे शेतीसाठी झालेला मुळ खर्च निघणेही अशक्य झाले असून संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी हवालदिल झाला आहे. शेती पिकांच्या नुकसानीसोबतच आता चंद्रपूर जिल्ह्यात आणि उर्वरित महाराष्ट्रात स्थानिक पातळीवर पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई जाणवू लागली आहे. जनावरांच्या चाऱ्यांचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून शेतमजूरांच्या हाताला काम नसल्याने ग्रामीण भागात रोजगाराचे मोठे संकट उभे ठाकले आहे. दुष्काळात्या या भीषण छायेमुळे ग्रामीण भागातील शेतकरी आणि सामान्य नागरिकांचे मनोबल पूर्णपणे खचले असल्याचे खा. प्रतिभा धानोरकर यांनी पत्रात नमूद केले आहे.

या आपात्कालीन परिस्थितीतून शेतकऱ्यांना बाहेर काढण्यासाठी केंद्र सरकारने तातडीने हस्तक्षेप करण्याची गरज. आहे. केंद्र सरकारने महाराष्ट्रासाठी विशेष आर्थिक पॅकेज जाहीर करुन त्याद्वारे प्रभावित शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत द्यावी, कर्जमाफी करावी, बियाणे व खतांवर सबसिडी उपलब्ध करुन द्यावी, तसेच पीक नुकसानीचा तात्काळ मोबदला देऊन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी पत्राद्वारे करण्यात आली आहे.

याशिवाय चंद्रपूर जिल्ह्यासह महाराष्ट्रातील दुष्काळाच्या वास्तविक तीव्रतेचे आणि नुकसानीचे अचूक मूल्यांकन करण्यासाठी केंद्र सरकारने तातडीने वरिष्ठ अधिकारी व तज्ज्ञांचे एक विशेष केंद्रीय पाहणी पथक महाराष्ट्रात पाठवावे, असेही त्यांनी पत्रात स्पष्ट केले आहे. महाराष्ट्राचा शेतकरी हा देशाचा मुख्य आधारस्तंभ असल्याने या कठिण काळात केंद्र सरकारने सकारात्मक निर्णय घेऊन तातडीने मदत पोहोचवावी, अशी विनंती खा. प्रतिभा धानोरकर यांनी केली आहे.




## इस्रायली निवडणुकीचे पडघम

येत्या २७ ऑक्टोबर रोजी इस्रायलच्या राष्ट्रीय संसदेची – 'क्नेसेट'ची – निवडणूक होत आहे. ७७ वर्षीय पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्या सरकारने गाझा पट्टीत केलेला नरसंहार आणि हिजबुल्ला व इराणविरुद्धचे युद्ध अशी ठळक पार्श्वभूमी या निवडणुकीस आहे. उजव्या विचारसरणीच्या 'लिकूड' पक्षाचे प्रतिनिधित्व करणारे नेतान्याहू १९९६मध्ये पहिल्यांदा पंतप्रधान झाले होते. मागील ३० वर्षांत नेतान्याहू एकूण १९ वर्षे पंतप्रधानपदावर आहेत. या काळात त्यांनी 'ग्रेटर इस्रायल'च्या स्थापनेला प्रचंड बळ दिले आहे. ओस्लो करारानुसार पॅलेस्टाइन स्वशासन अपेक्षित असलेल्या भूभागावर ज्यू वसाहती निर्माण करीत संपूर्ण पॅलेस्टाइनमध्ये इस्रायलची निरंकुश सत्ता प्रस्थापित करणे हे त्यांचे मुख्य उद्दिष्ट आहे. सात ऑक्टोबर २०२३ रोजी हमासने केलेल्या हल्ल्यामागील मुख्य कारण नेतान्याहू यांच्या वसाहतवादी धोरणाकडे जगाचे लक्ष वेधणे आणि अरब देशांना इस्रायलशी अब्राहम करार करण्यापासून रोखणे हे होते.

१२० सदस्यीय क्नेसेटमध्ये आजवर कोणत्याही एका पक्षाला साधे बहुमत म्हणजे ६१ जागा मिळालेल्या नाहीत. नेतान्याहू यांचे सरकार अति–उजव्या पक्षांशी युती करून सत्तेत आहे. क्नेसेटची निवडणूक 'पक्ष–यादी' पद्धतीनुसार होते. मतदानाच्या टक्केवारीनुसार संसदेत जागा मिळतात. किमान ३.५ टक्के मते मिळवणाऱ्या पक्षाला चार जागा मिळतात. एकूण ७३ लाख ३१ हजार मतदार २०हून अधिक पक्षांपैकी किमान आठ ते १० पक्षांना क्नेसेटमध्ये स्थान मिळवून देतात.

यंदा लिकूड, शास, युनायटेड तोराह जुडाईझम, झेहुत, ओत्झमा येहुदित आणि नोआम हे सत्तेतील अति–उजवे पक्ष स्वतंत्रपणे लढत आहेत. लिकूड मवाळ वाटेल एवढे इतर पक्ष कट्टरतावादी आहेत. लिकुडने झेहुतसोबत, तर शास पक्षाने युनायटेड तोराह जुडाईझमसोबत 'अतिरिक्त मतांचा' करार केला आहे. या करारानुसार दोन पक्षांच्या शिल्लक मतांची बेरीज होऊन अतिरिक्त जागा मिळू शकते. उदाहरणार्थ, २४ हजार मतांवर चार खासदार निवडले जात असतील आणि पाचव्या खासदारासाठी ३० हजार मते हवी असतील, तर २८ हजार मते मिळवणाऱ्या पक्षाकडे चार हजार मते शिल्लक उरतात. दुसऱ्या पक्षाकडे दोन हजार अतिरिक्त मते असल्यास, या सहा हजार मतांच्या बेरजेवर दोघांपैकी एकाला एक अतिरिक्त खासदार मिळतो.

विरोधी पक्ष प्रामुख्याने तीन आघाड्यांमध्ये लढत आहेत. माजी पंतप्रधान नफ्ताली बेनेट व याइर लॅपिड यांनी एकत्र येत 'टुगेदर' ही सर्वांत मोठी विरोधी आघाडी स्थापली आहे. लेबर आणि मेरेत्झ या मध्यममार्गी डाव्या पक्षांनी विलीनीकरण करून 'द डेमोक्रॅट्स' ही आघाडी बनवली आहे. तसेच ब्लू अँड व्हाईट आणि इस्रायल बेतेनू हे पक्ष स्वतंत्रपणे रिंगणात आहेत. या विरोधी पक्षांनी निवडणुकीनंतर नेतान्याहू यांच्या विरोधात एकत्र येण्याचे जाहीर केले आहे. 'टुगेदर' आणि 'इस्रायल बेतेनू' यांनी 'अतिरिक्त मतांचा करार' केला आहे.

इस्रायलच्या राजकारणात राअम आणि जॉइंट लिस्ट हे दोन अरब पक्षही आहेत. निवडणूक आयोगाने त्यांच्यावर देशद्रोहाच्या आरोपावरून बंदी आणली होती; परंतु सर्वोच्च न्यायालयाने ती बेकायदा ठरवली. यावरून इस्रायलच्या निवडणूक आयोगाच्या निष्पक्षतेवर निवडणुकीत चर्चा घडत आहे. अरब पक्ष क्नेसेटमध्ये पोहोचल्यास नवीन सरकार स्थापन करण्यात त्यांची भूमिका महत्त्वाची ठरू शकते आणि याचाच परिणाम नव्या सरकारच्या युद्ध व शांतता चर्चेच्या धोरणावर होऊ शकतो.

मागील महिनाभरातील सर्वेक्षणांनुसार ही निवडणूक अटीतटीची होईल, अशी चिन्हे आहेत. केवळ ७.५ टक्के मतदार पक्षाच्या नेतृत्वाकडे बघून मत देणार आहेत. सर्वाधिक २०.५ टक्के मतदार संरक्षण व परराष्ट्र धोरण विचारात घेऊन मतदान करतील, जे नेतन्याहू यांच्या पथ्यावर पडणारे आहे.

**– परिमल माया सुधाकर**

# रस्त्यांवरील खड्डे म्हणजे मृत्यूला निमंत्रण !

राज्यात सर्वत्र बांधकामाचा धडाका सुरू असून जनतेच्या भविष्यकाळातील सुख सोयींसाठी सहापदरी आणि आठपदरी रस्ते, नवे सिमेंट रस्ते, नवे उड्डाणपूल बांधल्या जात आहे. राज्याच्या विकासाच्या दृष्टीने पक्के रस्ते महत्त्वपूर्ण ठरतात. मात्र ते सदोष नसावेत. त्यामुळे रस्त्यांचे बांधकाम होणे जितके गरजेचे असते तितकीच त्यांची देखभाल दुरुस्ती महत्त्वाची असते. नव्याने उभारण्यात आलेल्या बहुतांश रस्त्यांवर टोल नाके उभारल्याने अशा रस्त्यांच्या दुरुस्तीचा प्रश्न मिटला असला तरी शहरांतर्गत किंवा शहरापासून ग्रामीण भागांना जोडणारे रस्ते, गावखेड्यातील रस्ते मात्र या विकासाच्या धडाक्यात उपेक्षित राहिले की काय? असा प्रश्न जनसामान्यांना पडायला लागला आहे.

आताच कुठल्यातरी एका गावात रस्त्यांवर खड्डे असल्याने एसटीने आपल्या फेऱ्या बंद केल्याचे वृत्त वाचनात आले होते. त्यामुळे विद्यार्थ्यांना नाहक मनस्ताप सहन करावा लागतो आहे. यंदा राज्यातील बहुतांश भागात दुष्काळ पडल्याचे चित्र आहे. पाऊस पडला नसला तरी राज्यातील कितीतरी रस्त्यांवर खड्डे असल्याच्या तक्रारी रोज वर्तमान पत्रांतून वाचायला मिळतात. एकतर मेट्रोचे बांधकाम आणि त्यात शहरांतर्गत रस्त्यांवर पडलेले खड्डे यामुळे अपघातांची संख्या वाढून लोकांचे जीव जात आहेत, याकडे संबंधित विभाग कधी लक्ष देईल तेच जाणे.

वाहन चालकांची सुरक्षा म्हणून दुचाकीस्वारांनी हेल्मेट घालायला पाहिजे, चारचाकी चालकांनी बेल्ट लावला पाहिजे म्हणून रस्ते परिवहन कार्यालयाचे नियम असतात. प्रसंगी दंड सुद्धा आकारला जातो. सरकारला जनतेच्या सुरक्षित प्रवासाची जर इतकीच काळजी आहे, तर मग रस्त्यांवर जागोजागी पडलेल्या खड्ड्यांची दुरुस्ती का केली जात नाही? नुसतीच डागडुजी करून पुन्हा जैसे थे सारखे गड्डे आता जीवघेणे ठरू पाहत आहे, हे नुकतेच नागपूर हुडकेश्वर परिसरातील खड्ड्यात गाडीचे चाक जाऊन मागे गाडीवर बसलेल्या भालचंद्र निलेश



सडमाके यांच्या मृत्यूवरून दिसून येते.

गेल्याच महिन्यात कामठी नागपूर रस्त्यावरील टेका नाका परिसरात रस्त्यावरील खड्ड्यांमुळे ई बाईक अनियंत्रित होऊन दुभाजकावर आदळल्याने खाली पडलेल्या अंजली पांडे या तरुणीला मनपाच्या इलेक्ट्रिक बसने चिरडल्याची घटना घडली होती. त्याची शाई वाळत नाही तर हुडकेश्वर परिसरातील ही दुसरी घटना काळीज हेलावून सोडणारी आहे.

आमच्या कामठी गुमथळा रस्त्यावर आजनी गादा पर्यंतचा डांबरी रस्ता तर कित्येक ठिकाणी उखडून गेला असून जागोजागी खड्डे पडल्याने या रस्त्याने वाहने चालविणे म्हणजे तारेवरची कसरतच म्हणावी लागते. आता हा रस्ता जनप्रतिनिधींना दिसतो की नाही, कळायला मार्ग नाही.

रस्त्यांवरील खड्ड्याने भिवंडी येथील एका महिलेचा जीव घेतला असल्याची घटना अगदीच ताजी असतांना ठाणे जिल्ह्यातील गोठेघर येथे रस्त्यावरच्या खड्ड्यांनी ठाणे आपत्ती प्रतिसाद दलाचे जवान विकास गोरे यांचा जीव घेतला. रस्त्यावरील खड्ड्यात दुचाकी उसळून झालेल्या अपघातात त्यांचा मृत्यू झाला झाल्याची घटना यंदाच्या ऑगस्ट महिन्यात घडली होती. निव्वळ अपघातच नव्हे तर या खड्ड्यांनी वाहतूक कोंडीचा प्रश्न देखील उपस्थित झालेला आहे. मागच्या महिन्यात तर नाशिक शहरातील खोदलेले रस्ते आणि खड्ड्यांमुळे झालेल्या वाहतूक कोंडीने त्यात अडकलेल्या जवळपास बाराशे उमेदवारांना परीक्षा केंद्रात पोहोचण्यास उशीर झाल्याने संघ लोकसेवा आयोगाच्या वतीने आयोजित राष्ट्रीय संरक्षण सेवेच्या पेपरला मुकावे लागले. याचा दोष कुणाला द्यायचा? रस्त्यांवरील खड्डे काही जनतेने खोदलेले नाहीत आणि सरकारनेही खोदलेले नाहीत. जड वाहने आणि वाढलेले परिवहन यामुळे रस्त्यांवर खड्डे होतात, यात शंका नाही. पण, नित्कृष्ट बांधकाम सुद्धा यास कारणीभूत आहे, ही बाब नाकारता येणारी नाही.

मात्र, अशा सदोष बांधकाम करणाऱ्या कंत्राटदारांना, त्यातील मलिदा खाणाऱ्या अधिकाऱ्यांना आणि त्यांच्यावर कृपाछत्र असणाऱ्यांना पाठीशी का घातले जाते, हेच कळत नाही.

पुणे जिल्ह्यातील सूस म्हाळुंगे मार्गावरील खड्ड्यांमुळे दुचाकी घसरून झालेल्या दुर्घटनेत एका दहा वर्षाच्या मुलाचा मृत्यू झाला होता. त्या मुलाचे मृत्यू प्रकरण ऑगस्ट महिन्यात बरेच गाजले होते. सदर मुलाच्या कुटुंबीयांना सहा लाख रुपयांची नुकसान भरपाई तत्काळ देण्यात यावी असे आदेश महापालिकेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी आयुक्त नवल किशोर राम यांना दिले होते.

शेतकऱ्यांना आपल्या शेतातील माल सुद्धा रस्त्याने नेता येत नसल्याने भिवापूर – चिखली मार्गाची तातडीने दुरुस्ती करावी म्हणून शेतकऱ्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मागणी केली आहे. म्हणजे रस्त्यांवरील खड्ड्यांचे लोण आता गावखेड्यांत देखील पोहचले असल्याचे चित्र दिसून येते. वास्तविक रस्त्यांवरील खड्डे म्हणजे मृत्यूला निमंत्रण असल्याने दरवर्षी पावसाळ्यात पडणाऱ्या खड्ड्यांची तात्काळ बुजवणी होणे गरजेचे असते. याशिवाय वाहन चालकांनी सुद्धा अशा रस्त्यांवरून वाहने चालवितांना गतिमान न होता सावधगिरी बाळगायला हवी. मात्र, स्थानिक प्रशासन आणि संबंधित विभाग या खड्ड्यांच्या दुरुस्तीकडे कानाडोळा करत असतील तर खड्ड्यांमुळे अपघात होऊन मरणाऱ्यांच्या मृत्यूला संबंधित विभाग आणि स्थानिक प्रशासन कारणीभूत आहेत, असेच म्हणावे लागते.

**– लीलाधर दवंडे**
**कामठी (नागपूर) ८४१२८७२२०**

# महान स्वातंत्र्य सेनानी राणी चेन्नमा

इंग्रजांनी आपल्या देशावर सुमारे पावणे दोनशे वर्ष राज्य केले. या पावणे दोनशे वर्षांत त्यांनी आपल्यावर अनेक अन्याय अत्याचार केले. इंग्रजांच्या याच अन्याय अत्याचाराच्या विरोधात लाखो ज्ञात अज्ञात देशभक्त बांधवांनी लढा दिला त्यात काही महिलाही होत्या हे मात्र अतिशय कमी लोकांना माहीत आहे. देशाला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या महिलांची यादी जर काढली तर अगदी हाताच्या बोटावर मोजता येतील इतक्या महिलांची नावे आपल्याला आठवतील कारण बऱ्याच महिला स्वातंत्र्य सैनिकांची म्हणा किंवा देशासाठी त्याग करणाऱ्या देशभक्त महिलांची म्हणा आपल्या इतिहासकारांनी नोंदच घेतली नाही त्यामुळे त्यांचा इतिहास नवीन पिढीच्या समोर आलाच नाही. अशाच एका देशभक्त महिला स्वातंत्र्य सेनानीच्या शौर्याची माहिती आज आपण या लेखातून घेऊ कारण आज त्या महान महिला स्वातंत्र्य सेनानीची जयंती आहे. त्या महान स्वातंत्र्य सेनानीचे नाव आहे कित्तुरची राणी चेनम्मा.

२३ ऑक्टोबर १७७८ रोजी बेळगाव येथील काकटी या छोट्या गावात राणी चेन्नमा यांचा जन्म झाला. लहानणापासूनच धाडसी असलेल्या राणी चेन्नमा यांना त्यांचे वडील धुळाप्पा देसाई गौड्रारू यांनी घोडेस्वारी करणे, तलवार चालवणे, भाला फेकणे याचे शिक्षण दिले. वयाच्या पंधराव्या वर्षी राणी चेन्नमा यांचा विवाह देसाई कुटुंबातील राजा मल्लसराज यांच्याशी झाला. मात्र १८२४ हे वर्ष त्यांच्यासाठी दुर्भग्याचे वर्ष ठरले कारण याच वर्षी त्यांच्या पतीचे आणि मुलाचेही निधन झाले. एकाच वर्षी पती आणि मुलगा सोडून गेल्याने त्यांच्यावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला.

राजा मल्लसराज यांच्या निधनाने त्यांच्या राज्यात अस्थैर्य माजले याचा लाभ घेण्यासाठी इंग्रजांनी त्यांच्या राज्यावर आक्रमण करण्याचे ठरवले. इंग्रजांकडून राज्य वाचवण्याची फार मोठी जबादारी राणी चेन्नमा यांच्यावर येऊन पडली मात्र त्या डगमगल्या नाहीत. त्यांनी तात्काळ आपली राजधानी डोंगर भागात हलवली. राजगादीला वारस असावा म्हणून त्यांनी शिवलिंगप्पा नावाचा पुत्र दत्तक घेतला व त्याला राज्याचा उत्तराधिकारी बनवले मात्र तत्कालीन ब्रिटिश अधिकारी लॉर्ड डलहौसी याने दत्तक विधान नाकारत शिवलिंगप्पा याची राज्याचा वारसदार म्हणून हाकलपट्टी करण्याचा आदेश दिला.



जर एखाद्या राज्याचा राजा निधन पावला आणि त्याला वारस नसेल तर दत्तक असलेला पुत्र राज्याचा वारस होऊ शकत नाही त्यामुळे ते राज्य खालसा करून तिथे ब्रिटिश अंमल सुरू करण्याचा निर्णय इंग्रजांनी घेतला होता त्यामुळे कोणत्याही परस्थितीत आपले राज्य इंग्रजांच्या ताब्यात जाऊ द्यायचे नाही असा निर्धारच राणी चेन्नमा यांनी केला होता.

कित्तुरचे राज्य हे धारवाड जिल्ह्यात येत होते. सेंट जॉन थाच्रेय हा त्यावेळी धारवाडचा गव्हर्नर होता तर चॅप्लिन हा कमिशनर होता. या दोघांनीही राणी चेन्नमा यांना राज्य खालसा करण्याची सूचना केली आणि तसे न केल्यास युद्धास तयार राहण्यास सांगितले. राणी चेन्नमा यांनी शेवटचा पर्याय म्हणून बॉम्बे प्रेसिडेंटचे लेफ्टनंट गव्हर्नर एल्फिन्स्टन यांना राज्य खालसा करण्याबाबत विनंती अर्ज केला मात्र त्यांनी तो धुडकावून लावत कितुरवर हल्ला चढवला. इंग्रजांनी कित्तुरवर हल्ला चढवला आणि कित्तुरचा खजिना लुटण्याचा प्रयत्न केला. कित्तुरच्या खजिन्यात त्यावेळी मौल्यवान दागदागिने आणि दीड कोट रुपये इतका खजिना होता. इंग्रजांच्या मद्रास नेटीव्ह हॉर्स अर्टेलरीच्या तिसऱ्या तुकडीत २० हजारांपेक्षा अधिक सैनिक होते त्यात सुमारे ४०० पेक्षा अधिक सैनिक हे बंदूकधारी होते.

मात्र राणी चेन्नमा यांचे सैन्यही कमी नव्हते त्यांनी इंग्रज सैन्या विरुद्ध निकराचा लढा दिला आणि इंग्रज सैन्याचा धुव्वा उडवला. राणी चेन्नमा यांचे सैन्य आपल्याशी अशाप्रकारे धैर्याने मुकाबला करतील अशी अपेक्षा इंग्रजांना नव्हती त्यांनी राणी चेन्नमाच्या सैन्याला हलक्यात घेतले. राणी चेन्नमाचे सैन्याचे बळ इंग्रजांच्या तुलनेत अल्प होते मात्र राणी चेन्नमा यांनी आपल्या सैनिकांमध्ये स्फूर्ती निर्माण केली. आपली राणी महिला असूनही इंग्रजांशी निकराने लढते हे पाहून त्यांनाही स्फुरण चढले आणि त्यांनी इंग्रज सैन्याचा पराभव केला. या युद्धात सेंट जॉन हा गव्हर्नर मारला गेला. इंग्रजांच्या काही अधिकाऱ्यांना राणी चेन्नमा यांच्या सैनिकांनी बंदी बनवले. युद्ध बंदी करण्याच्या अटीवरच या अधियाऱ्यांची सुटका करण्यात आली. युद्ध बंदीचा करार करूनही इंग्रज अधिकाऱ्यांनी तो पाळला नाही. कमिशनर चॅप्लिन याने मोठ्या ताकदीनिशी कुत्तुरवर पुन्हा हल्ला केला. यावेळीही राणी चेन्नमाच्या सैन्याने निकराने लढा दिला मात्र बैल होगल किल्ल्यात राणी चेन्नमा पकडल्या गेल्या आणि त्यांना कैदेत टाकण्यात आले. २१ फेब्रुवारी १८२९ रोजी इंग्रजांच्या कैदेतच राणी चेन्नमा यांचे निधन झाले. राणी चेन्नमा यांच्या निधनानंतरही राणीचे सैन्य इंग्रजांशी लढत राहिले मात्र तो लढा अपयशी ठरला. मात्र राणी चेन्नमा यांचे शौर्य पाहून इंग्रज अधिकाऱ्यांनी त्यांना सलाम केला. राणी चेन्नमा यांचे शौर्य इतिहासाच्या पानावरील एक स्फूर्तिदायक अध्याय आहे मात्र आजही हा इतिहास तरुण पिढीपासून दूर आहे म्हणूनच हा लेख प्रपंच. भारतीय इतिहासातील एक सुवर्ण अध्याय म्हणून राणी चेन्नमा यांच्या लढ्याकडे पाहायला हवे. जयंतीदिनी राणी चेन्नमा यांना विनम्र अभिवादन!

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## कंत्राटी भरती

कामगारांची भरती
पध्दती ती कंत्राटी
काम द्या एजंसीला
कमी होई कटकटी

एजंसी होती गब्बर
भरावी पैशांचीपेटी
कामगार गप्प गार
झोपा रिकामं पोटी

संप बंद आंदोलने
नसे ससेमिरा पाठी
उपोषणनिदर्शनांस
मिळेआपसूक सुटी

सेवा मिळतेचटपटी
कामाचीनाही खोटी
रोजगार मिळे सर्वां
आश्वासने का खोटी

पीएफ पेंशन कुठली
पोटे गेलेली खपाटी
कामावरून काढता
कोरीआमची रे पाटी

नादालालागले फुका
सारे पोरे तरणीताठी
आम्ही तसेच कंत्राटी
उलटलीजरीही साठी

**– हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

## गोकुळच्या विजयाने राज्याच्या राजकारणात सतेज पाटलांचे महत्व पुन्हा एकदा अधोरेखित

नुकताच कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ अर्थात गोकुळची २५ जागेसाठी निवडणूक झाली. हि निवडणूक कोल्हापूर जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात आणि कर्नाटकाच्या सीमाभागात गाजली अतिशय अतितटीच्या, संघर्षमय आणि प्रतिष्ठेच्या लढाईत काँग्रेस विधानपरिषद गटनेते सतेज ऊर्फ बंटी पाटील यांच्या समविचारी आघाडीला बहुमताचा१३ उमेदवारांची विजयी पताका घेऊन जादुई आकडा पार करता आला. या निवडणुकीत १ सीएम, २ डिसिएम, १० आमदार, १ खासदार,१ राज्यसभा खासदार आणि २ मंत्री यांच्या विरोधात बंटी पाटलांनी निकराची झुंज देवून विजयाचा झेंडा फडकावला.

त्यामुळे पुन्हा एकदा सतेज पाटलांच्या कार्यपद्धतीवर शिक्कामोर्तब झाले असून राबणारा नेता अशी त्यांची जनमाणसात प्रतिमा निर्माण झाली आहे. त्यामुळे राज्याच्या राजकारणात बंटींचे महत्व वाढले आहे. या गोकुळच्या विजयाने राजकीय संदर्भ बदलले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. महाराष्ट्राच्या बारामतीत या लाडक्या नेत्याचे भावी मुख्यमंत्री म्हणून फ्लेक्स झळकतं आहेत.

सतेज पाटलांची एक खासियत आहे एकदा का जबाबदारी घेतली की यशस्वीपणे पार पडायची त्यामुळे बंटींच्या राजकीय पॅटर्नची सातत्याने चर्चा होते. गोकुळची वार्षिक उलाढाल ४ हजार कोटींच्यावर असून ५ लाख दूध उत्पादक जोडले गेले आहेत. सरासरी दैनंदिन १६ ते २० लाख लिटर दुध संकलन होते अशा या संघाचे नेतृत्व सतेज पाटलांच्याकडे आल्यांने दुध उत्पादकांच्या अशा पल्लवीत झाल्या आहेत दिलेला शब्द पाळणारा, स्वछ प्रतिमेचा, आश्वासक चेहरा म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते.

**– राजू जाधव, मांगूर जि. बेळगांव.**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

## मनोरुग्ण व भिक्षेकरी बांधवांना कपडे आणि फळवाटप करून अनोख्या पद्धतीने साजरा केला वाढदिवस



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२२, चिमूर :** आजकाल वाढदिवस म्हटला की हॉटेलमधील पार्ट्या, फटाक्यांची आतिषबाजी आणि हजारो रुपयांची उधळपट्टी हे चित्र सर्रास पाहायला मिळते. मात्र, या सर्व भपकेबाजपणाला फाटा देत शुभम बारसागडे व प्रवीण वाघे या दोन तरूणांनी सामाजिक बांधिलकी जपत आपला वाढदिवस अतिशय स्तुत्य व प्रेरणादायी पद्धतीने साजरा केला आहे.

आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधून व्हॉईस ऑफ मिडीयाचे चिमुर तालूका सचीव शुभम बारसागडे व सदस्य प्रविण वाघे यांनी चिमूर तालुक्यातील जामगांव येथील दिव्यवंदना फाऊंडेशन येथील प्रभुजींना नवीन कपडे आणि ताज्या फळांचे वाटप केले. व त्यांच्या सोबत केक कापून वाढदिवस साजरा केला, अनोख्या उपक्रमाचे सर्वस्तरातून भरभरून कौतुक होत आहे.

**अनोख्या उपक्रमाची सर्वत्र चर्चा :** रस्त्यावर, बस स्थानक व रेल्वे स्थानक परिसरात उघड्यावर जीवन जगणाऱ्या, मानसिकदृष्ट्या खचलेल्या व अन्न-वस्त्रासाठी वणवण भटकणाऱ्या मनोरुग्ण व भिक्षेकऱ्यांची अवस्था अत्यंत बिकट असते. अशा व्यक्तींना जामगांव येथील दिव्यवंदना फाऊंडेशन येथे आसरा दिला जातो. इथे राहणाऱ्या व्यक्तींना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न दिव्यवंदना फाऊंडेशन करीत असते. हीच बाब लक्षात घेऊन या दोन्ही मित्रांनी आपल्या आनंदाच्या क्षणी या उपेक्षित घटकाला सोबत घेण्याचा निर्णय घेतला. वाढदिवसाच्या दिवशी त्यांनी स्वतः प्रभुजींची आपुलकीने चौकशी केली. त्यांना नवीन कपडे परिधान करण्यास दिले तसेच पौष्टिक फळांचे वाटप करून त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवला.

**तरुणाईसमोर आदर्श :** शुभम व प्रविण यांच्या या सामाजीक उपक्रमात शुभम बारसागडे यांचे आई, वडिल, व्हॉईस ऑफ मिडीया चे चिमूर तालूका अध्यक्ष पंकज मिश्रा, साप्ताहीक विंग चे चंद्रपूर जिल्हा कार्याध्यक्ष सुरेश डांगे, तालूका कार्यकरीणी सदस्य नरेन्द्र नागोसे, शुभम मोरे, कुंदन पडवेकर व त्यांच्या इतर मित्रांनी आणि स्थानिक नागरिकांनीही सहभाग नोंदवला. वाढदिवसासारख्या वैयक्तिक आनंदाच्या प्रसंगी सामाजिक भान ठेवून गरजूंना मदतीचा हात देणाऱ्या या दोन्ही तरुणांचा हा आदर्श आजच्या तरुणाईसाठी नक्कीच प्रेरणादायी आणि दिशादर्शक ठरणारा आहे. स्थानिक नागरिक व विविध सामाजिक संघटनांच्या वतीने शुभम आणि प्रवीण यांच्या या उपक्रमाचे कौतुक करून त्यांना भावी आयुष्यासाठी व वाढदिवसाच्या भरभरून शुभेच्छा देण्यात आल्या.

## खापरखेडा येथील ग्रीन जिम उद्यानाची दुरवस्था

### आ.डॉ.देशमुख यांनी दिले पोकळ आश्वासन




**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२२, नागपूर :** २५ वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर खापरखेडा औष्णिक वीज केंद्राच्या जॉर्ज कॉलनी परिसरात ग्रीन जिम व निसर्गरम्य उद्यान साकारण्यात आले असून काही महिन्यातच या उद्यानाची दयनीय अवस्था झाली आहे. उद्यानाचे लोकार्पण करणारे स्थानिक आमदार डॉ. आशिष देशमुख यांनी पोकळ आश्वासन दिल्यामूळे तीव्र संताप व्यक्त होत आहे.

रोप-वे व जॉर्ज कॉलनी येथील सोलर प्रकल्प गुंडाळून खेळासाठी हक्काचे मैदान, निसर्गरम्य उद्यान व ग्रीन जिम उभारण्यात आले. आमदार डॉ. आशिष देशमुख यांच्या हस्ते या उद्यानाचे लोकार्पण करण्यात आले. सुरुवातीला मॉर्निंग वॉक आणि व्यायामासाठी शेकडो नागरिकांची गर्दी होत होती. मात्र, खापरखेडा वीज केंद्र प्रशासनाने हेतुपुरस्सर दुर्लक्ष केल्यामूळे उद्यानाला अक्षरशः अवकळा आली आहे.

उद्यान परिसरात खासगी सुरक्षा रक्षक तैनात करण्यात आले तरीही रात्रीच्या वेळी तळीरामांनी या उद्यानाला चक्क दारूचा अड्डा बनवले आहे. सर्वत्र रिकाम्या बाटल्या, कचरा, अस्ताव्यस्त वाढलेले गवत त्यामुळे घाणीचे साम्राज्य पसरले आहे. दुर्गंधी आणि समाजकंटकांच्या वाढत्या उपद्रवामुळे महिला, ज्येष्ठ नागरिक व चिमुकल्यानी उद्यानाकडे पाठ फिरवली असून सकाळ-संध्याकाळी फिरायला येणाऱ्यांची संख्या कमी झाली आहे.

परिसरातील या एकमेव मैदान उद्यानाची दुर्दशा होत असल्यामूळे अनेकांनी वीज केंद्राच्या मुख्य अभियंत्यांपासून ते संबंधित अधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रारी केल्या. मात्र, दखल घेण्यात आली नाही वीज केंद्र प्रशासनाने हात वर केल्यामुळे संतप्त नागरिकांनी आमदार डॉ. आशिष देशमुख यांच्याकडे धाव घेतली. मात्र, आमदार देशमुखांनी संबंधित अधिकाऱ्यांशी बोलतो असे उत्तर देऊन केवळ वेळ मारून नेली त्यामुळे आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.

स्थानिक आमदार डॉ आशिष देशमुख व खापरखेडा औष्णिक वीज केंद्राचे मुख्य अभियंता यांनी लक्ष घालून उद्यानातील गवत व घाण स्वच्छ करण्याचे आदेश संबंधितांना द्यावे व तळीरामांचा बंदोबस्त करण्यासाठी पोलिसांची गस्त वाढवावी अशी मागणी करण्यात येत आहे.

## ठाणे महापालिकेतर्फे २७ ऑक्टोबरपासून राष्ट्रीय जंतनाशक मोहीम

**दि.२२, ठाणे :** ठाणे महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राष्ट्रीय जंतनाशक दिनानिमित्त २७ ऑक्टोबर २०२६ रोजी जंतनाशक मोहीम राबविण्यात येणार आहे. तसेच ३ नोव्हेंबर २०२६रोजी मॉप-अप दिन आयोजित करण्यात येणार असून, या मोहिमेद्वारे १ ते १९ वर्षे वयोगटातील मुला-मुलींना जंतनाशक गोळ्या देण्यात येणार आहेत.

बालकांचे आरोग्य, पोषणविषयक स्थिती, शिक्षणाची संधी आणि जीवनमान सुधारण्याच्या उद्देशाने ही मोहीम राबविण्यात येत आहे. महापालिका, शासकीय अनुदानित, खासगी अनुदानित शाळा तसेच अंगणवाडी केंद्रांमध्ये दाखल असलेल्या आणि शाळेत न जाणाऱ्या बालकांपर्यंतही ही मोहीम पोहोचविण्यात येणार आहे. यामध्ये आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, शिक्षण विभाग, महिला व बालविकास विभाग, पंचायत राज मंत्रालय आदींचा सहभाग आहे.

जंतांचा प्रादुर्भाव प्रामुख्याने अस्वच्छता आणि मातीच्या संपर्कातून होतो. दूषित मातीच्या संपर्कात आल्यामुळे जंतांचा संसर्ग होऊ शकतो. राउंड वर्म, व्हिप वर्म आणि हुक वर्म या प्रकारच्या जंतांमुळे मुलांच्या आरोग्यावर परिणाम होतो. जंतांचा प्रादुर्भाव झालेल्या मुलांमध्ये कुपोषण व रक्तक्षय होण्याची शक्यता असते. त्यामुळे त्यांची शारीरिक वाढ आणि मानसिक विकास प्रभावित होऊ शकतो.

या मोहिमेंतर्गत १ ते १९ वर्षे वयोगटातील मुलांना अल्बेंडाझोल ही जंतनाशक गोळी देण्यात येणार आहे. १ ते ६ वर्षे वयोगटातील लाभार्थ्यांना अंगणवाड्यांमधून, तर ६ ते १९ वर्षे वयोगटातील मुलांना महापालिका शाळा, शासकीय अनुदानित शाळा, खासगी अनुदानित शाळा, आश्रमशाळा तसेच महानगरपालिका क्षेत्रातील इतर शाळांमधून गोळ्यांचे वाटप करण्यात येणार आहे.

## लासलगाव पोलिसांची धडाकेबाज कामगिरी : दागिने पळवणारा सराईत गुन्हेगार जेरबंद

### देवरगाव येथील घटनेचा छडा; सीसीटीव्ही व तांत्रिक पुराव्यांच्या आधारे पोलिसांनी आवळल्या मुसक्या



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२२, लासलगाव (नाशिक) :** लासलगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका ६२ वर्षीय ज्येष्ठ महिलेचा विश्वास संपादन करून त्यांच्या अंगावरील सोन्याचे दागिने लांबवणाऱ्या भामट्याला लासलगाव पोलिसांनी जेरबंद केले आहे. पोलिसांनी चोरीला गेलेला संपूर्ण मुद्देमाल हस्तगत करण्यात यश मिळवले असून, चोरीचे दागिने बेकायदेशीररीत्या खरेदी करणाऱ्या सराफ व्यावसायिकाचा सहभागही यामध्ये समोर आला आहे.

**नेमकी घटना काय होती?**

लासलगाव पोलीस ठाण्यात १८ जुलै २०२६ रोजी देवरगाव (ता. चांदवड, जि. नाशिक) येथील गयाबाई शंकर काकडे (वय ६२) यांनी फिर्याद दिली होती. फिर्यादी या ज्येष्ठ नागरिक असल्याचा फायदा घेत एका अज्ञात व्यक्तीने पाऊस सुरू असताना त्यांना गावी सोडून देण्याच्या बहाण्याने आपल्या मोटारसायकलवर बसवले. वाटेत संधी साधत त्याने त्यांच्या गळ्यातील सुमारे ४५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले होते. या प्रकरणी लासलगाव पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.

**तांत्रिक पुराव्यांमुळे आरोपी गळाला**

गुन्ह्याचा तपास करत असताना लासलगाव पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक पुराव्यांच्या आधारे तपास चक्र वेगाने हलवले. तपासात सचिन सुदाम ढेपले (वय ४०, रा. ढेपले वस्ती, नादुर्डी रोड, निफाड, जि. नाशिक) या व्यक्तीचा सहभाग निष्पन्न झाला. पोलिसांनी त्याला तात्काळ ताब्यात घेऊन कसून चौकशी केली असता त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली.

**सराफाकडून संपूर्ण मुद्देमाल हस्तगत**

पोलिस चौकशीदरम्यान मुख्य आरोपीने चोरीचे दागिने अजय रमेश कुलथे (रा. इंदिरानगर, नाशिक) या सराफ व्यावसायिकाला विकल्याची माहिती दिली. पोलिसांनी या सराफाकडे चौकशी केली असता, कोणत्याही खरेदी-विक्रीच्या कायदेशीर पावत्या नसताना त्याने हे दागिने खरेदी केल्याचे उघड झाले. पोलिसांनी संबंधित सराफाकडून फिर्यादीचे संपूर्ण सोन्याचे दागिने जप्त केले असून महिलेचा संपूर्ण मुद्देमाल सुरक्षित परत मिळाला आहे.

तपासात मुख्य आरोपी सचिन ढेपले हा एक सराईत गुन्हेगार असल्याचे समोर आले असून, त्याच्याविरुद्ध पिंपळगाव बसवंत, सायखेडा आणि एमआयडीसी सिन्नर पोलीस ठाण्यांमध्येही अशाच प्रकारचे गुन्हे दाखल आहेत.

**पोलिसांचे पथक आणि नागरिकांसाठी आवाहन**

नाशिक जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक डॉ. स्वामी, अपर पोलीस अधीक्षक विमला एम. आणि निफाड विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी के. के. पाटील यांच्या मार्गदर्शनखाली लासलगाव पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सागर बी. कोते, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक किशोर बी. पवार, पोलीस हवालदार संदीप निचळ, पोलीस शिपाई शशिकांत निकम व अमोल तळेकर यांनी या गुन्ह्याचा यशस्वी छडा लावला. नागरिकांसाठी विशेष सूचना: अनोळखी व्यक्तींच्या वाहनावर लिफ्ट मागून बसताना किंवा प्रवास करताना ज्येष्ठ नागरिकांनी विशेष खबरदारी घ्यावी. तसेच आपल्या अंगावरील सोन्याचे दागिने व मौल्यवान वस्तूंच्या सुरक्षेसंदर्भात सावध राहण्याचे आवाहन लासलगाव पोलिसांच्या वतीने करण्यात आले आहे.

## महाबळेश्वरमध्ये नवरात्रोत्सवानिमित्त सामाजिक उपक्रमांची पर्वणी...

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.२२, महाबळेश्वर (सातारा) :** श्री विघ्नहर्ता व्यापारी असोसिएशन मित्र मंडळ, महाबळेश्वर यांच्या वतीने रोटरी क्लब ऑफ महाबळेश्वरच्या संयुक्त विद्यमाने नवरात्रोत्सव २०२६ निमित्त आयोजित पारंपरिक वेशभूषा आणि महिला पाककला स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी राबविण्यात येणाऱ्या 'एक वही, एक पेन - कुलस्वामिनी चरणी' या सामाजिक उपक्रमाचेही महाबळेश्वरमध्ये कौतुक होत आहे.

पारंपरिक वेशभूषा स्पर्धेत बालकांनी विविध पौराणिक, ऐतिहासिक आणि संतपरंपरेतील व्यक्तिरेखा साकारत भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविले. या स्पर्धेचे परीक्षण कलाक्षेत्रातील श्री. किसन खामकर आणि श्रीमती लीलाताई शिंदे यांनी केले. महिला पाककला स्पर्धेत महिलांनी केवळ २०० रुपयांच्या मर्यादेत तयार केलेल्या पदार्थांचे आकर्षक सादरीकरण केले. पाककला स्पर्धेचे परीक्षण शेफ सुनील आणि शेफ ब्रिजभूषण सिंह यांनी केले.

'एक वही, एक पेन' उपक्रमांतर्गत भाविक व नागरिक विद्यार्थ्यांच्या



शैक्षणिक मदतीसाठी वही-पेन अर्पण करीत आहेत. विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.

दोन्ही स्पर्धांचा बक्षीस वितरण समारंभ रविवार, दि.१८ ऑक्टोबर रोजी रात्री ८ वाजता संपन्न झाला

या वेळी रोटरी क्लब ऑफ महाबळेश्वरचे प्रेसिडेंट रो. महेश कोमटी, सेक्रेटरी रो.डॉ.आशिष चोपडे आणि रोटरी क्लबचे सदस्य उपस्थित होते.

या स्पर्धांच्या यशस्वितेसाठी मंडळाचे अध्यक्ष सुमित क्षीरसागर, उपाध्यक्ष प्रताप जाधव तसेच सभासद अभिषेक साळुंखे, अमित माळवदे, गौरव वाईकर, केतन बगाडे, मनीष साळुंखे आणि प्रणव जंगम यांनी परिश्रम घेतले. तसेच कार्यकुशल नगरसेवक संजय जंगम यांचे मंडळास मागदर्शन लाभले.

## रत्नागिरी येथे होणाऱ्या आंतरमहाविद्यालयीन तायक्वाँडो स्पर्धेसाठी सुभाष पाटील यांची रेफ्री चेअरमन म्हणून निवड

**अक्षराज : संदिप येवले**

**दि.२२, मुंबई :** रत्नागिरी येथे दिनांक २५ ते २८ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात येणाऱ्या आंतरमहाविद्यालयीन तायक्वाँडो २०२६ - २०२७ या स्पर्धे साठी आंतरराष्ट्रीय तायक्वाँडो पंच सुभाष पाटील यांची रेफ्री चेअरमन म्हणून निवड करण्यात आली आहे.

या स्पर्धेसाठी महाराष्ट्रातील अनुभवी राष्ट्रीय दर्जाच्या पंचांची निवड करण्यात आली असून, विद्यापीठाचे डायरेक्टर ऑफ स्पोर्ट्स अँड फिजिकल एज्युकेशन मनोज रेड्डी सर यांच्या मार्गदर्शनाखाली पंचांची नियुक्ती करण्यात आली आहे.

आंतरराष्ट्रीय तायक्वाँडो पंच म्हणून



सुभाष पाटील यांनी भारतासह अनेक देशांमध्ये पंच म्हणून काम केले आहे. त्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांचा प्रदीर्घ अनुभव असून, तायक्वाँडो खेळाच्या प्रसारासाठी आणि खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी ते गेली अनेक वर्षे कार्यरत आहेत.

**स्पर्धेसाठी निवड झालेल्या पंचांची यादी**

१. सुभाष पाटील : रेफ्री चेअरमन, २. कार्तिक नायडू, ३. सुमेध मार्चंडे, ४. अमेय मोरे, ५. स्वप्नील साळुंखे, ६. अंकिता पोटे, ७. तुषार पाटील, ८. शीतल आचरेकर, ९. स्वप्नील दांडेकर, १०. कुणाल चव्हाण, ११. श्रुती मांडवकर, १२. भरत कार्रा, १३. प्रतीक पवार, १४. आकाश बरई, १५. तेजस माळी, १६. साहिल वाघमारे, १७. संकेत सावंत

रत्नागिरी येथे होणारी ही विद्यापीठस्तरीय स्पर्धा शिस्तबद्ध, पारदर्शक आणि यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी सुभाष पाटील हे निःस्वार्थ भावनेने आपली जबाबदारी पार पाडणार आहेत. त्यांच्या अनुभवाचा आणि मार्गदर्शनाचा लाभ या स्पर्धेतील पंचांना तसेच खेळाडूंना होणार आहे.

या निवडीबद्दल क्रीडा क्षेत्रातून सुभाष पाटील यांचे अभिनंदन करण्यात येत असून, रत्नागिरी येथे होणारी आंतरमहाविद्यालयीन तायक्वाँडो स्पर्धा यशस्वी होण्यासाठी सर्व पंचांकडून उत्कृष्ट योगदान दिले जाईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## जावळीतील वृक्षारोपण प्रकरण पेटले: रोपांचा पंचनामा करून दोषींवर कारवाई करा

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२२, पेण :** जावळी ग्रामपंचायत हद्दीत वृक्षारोपणासाठी सामाजिक वनीकरण विभागाकडून उपलब्ध करून देण्यात आलेल्या रोपांची हेळसांड झाल्याचा प्रकार समोर आल्यानंतर आता या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. वृक्षारोपणासाठी आणलेली रोपे तब्बल महिनाभर रस्त्याच्या कडेला पडून असल्याचे वृत्त यापूर्वी प्रसिद्ध झाले होते. त्यानंतर काही रोपांची लागवड करण्यात आली; मात्र उर्वरित रोपे गवताच्या झुडपांत टाकलेली असल्याचे छायाचित्र समोर आल्याने या प्रकरणाला गंभीर वळण मिळाले आहे.या पार्श्वभूमीवर पत्रकार मितेश जाधव यांनी पेण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी आणि सामाजिक वनीकरण विभागाकडे स्वतंत्र निवेदने बुधवार दि २१ रोजी सादर करून रोपांचा प्रत्यक्ष पंचनामा, सखोल चौकशी आणि जबाबदार व्यक्तींवर नियमानुसार कारवाई करण्याची मागणी केली आहे.

जावळी ग्रामपंचायतीला सामाजिक वनीकरण विभागाकडून एकूण किती रोपे वितरित करण्यात आली, त्यापैकी किती रोपांची प्रत्यक्ष लागवड झाली, किती रोपे गवताच्या झुडपांत किंवा अन्य ठिकाणी टाकण्यात आली आणि किती रोपे खराब अथवा नष्ट झाली, याची अधिकृत माहिती उपलब्ध करून देण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे तसेच संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन पाहणी करावी, छायाचित्रांसह पंचनामा करावा आणि रोपांच्या सद्यस्थितीचा लेखी अहवाल द्यावा, अशी मागणीही पत्रकार मितेश जाधव यांनी केली आहे.

वृक्षारोपणासाठी शासनाकडून रोपे उपलब्ध करून देण्यात आली असल्यास, त्यासाठी झालेल्या खर्चाचा आणि रोपांच्या वितरणासंबंधीच्या नोंदींची पडताळणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. पर्यावरण संवर्धनासाठी उपलब्ध करून दिलेल्या रोपांची योग्य प्रकारे लागवड आणि देखभाल झाली आहे की नाही, याची तपासणी करणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

रोपे गवताच्या झुडपांत कशी पोहोचली, त्यांची निगा राखण्याची जबाबदारी कोणाकडे होती आणि या प्रकरणात निष्काळजीपणा झाला आहे का, याची निष्पक्ष चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

एकीकडे शासनाकडून पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपणाला प्रोत्साहन दिले जाते, तर दुसरीकडे लागवडीसाठी उपलब्ध झालेल्या रोपांची अशी अवस्था होत असेल, तर वृक्षारोपणाच्या उद्देशावरच प्रश्नचिन्ह निर्माण होते. रोपे लावणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच त्यांचे संगोपन आणि संरक्षण करणेही आवश्यक आहे.

त्यामुळे गटविकास अधिकारी आणि सामाजिक वनीकरण विभागाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन प्रत्यक्ष पंचनामा करावा, रोपांच्या वितरणापासून ते लागवड व संगोपनापर्यंतच्या प्रक्रियेची पडताळणी करावी आणि चौकशीचा अहवाल उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी पत्रकार मितेश जाधव यांनी केली असून या निवेदनाची संबंधित विभाग कितपत दखल घेतात, प्रत्यक्ष पंचनामा कधी होतो आणि चौकशीतून काय निष्पन्न होते, प्रकरणाकडे सर्वांचं लक्ष लागले आहे.

# जिल्हा बँकेच्या ११ जागा बिनविरोध १० जागांसाठी निवडणूक

## विखे-थोरात, लंके व प्रा.शिंदेंचे स्वतंत्र पॅनेल




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२२, अहिल्यानगर :** अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीत अखेर ११ उमेदवार बिनविरोध झाले. आता १० जागांसाठी २७उमेदवार रिंगणात उतरले आहेत. त्यांच्यासाठी दिग्गज नेत्यांची प्रतिष्ठा पणाला लागणार आहे. यासाठी विखे-थोरात, लंके व प्रा. शिंदेंचे स्वतंत्र पॅनेल, कपबशी-छत्री- शिट्टी असा सामना रंगणार आहे. सर्वाधिक चुरस महिला राखीव जागेसाठी आहे. तेथे दोन जांगासाठी सात महिला रिंगणात असून त्यातील अनेक जणी जिल्हा परिषदेच्या राजकारणातील आहेत.

जिल्हा सहकारी बँकेसाठी २ नोव्हेंबरला मतदान होणार आहे व त्याची मतमोजणी ३ नोव्हेंबरला होणार आहे. या निवडणुकीत पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांचे सहकार विकास पॅनेल असून, त्यांना कपबशी चिन्ह मिळाले आहे. खा. निलेश लंके व माजी खासदार सदाशिव लोखंडे यांचे सहकार परिवर्तन पॅनेल असून, त्यांना छत्री चिन्ह मिळाले आहे. तर विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनीही तिसरे स्वतंत्र पॅनेल केले असून, त्याला शिट्टी चिन्ह मिळाले आहे.

सोसायटी मतदार संघात १० जागा बिनविरोध झाल्या व चार जागांवर लढती होत आहेत. बिगरशेती मतदार संघ जागा बिनविरोध झाली आहे. महिला राखीवच्या दोन तसेच, शेती पूरक संस्था, अनुसूचित जाती-जमाती, भटके विमुक्त व ओबीसी या मतदार संघात चुरस रंगणार आहे. दरम्यान, बिनविरोध झालेल्या ११ जणांपैकी थोरात गटाचे ६, विखे गटाचे ४ व प्रा. राम शिंदे गटाचा १ उमेदवार असल्याचे सांगितले जाते. अकोले व कर्जत सोसायटी मतदार संघातील लढती रिंगणातील चारही उमेदवार स्वबळावर लढत आहेत. अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेचे सुमारे साडेतीन हजारांवर सभासद प्रतिनिधी मतदार आहेत. बँकेच्या संचालक मंडळाच्या २१ जागा आहेत.

**बिनविरोध झालेले ११ संचालक**

सोसायटी मतदार संघ: जामखेड - सचिन घुमरे (प्रि.शिंदे गट), अहिल्यानगर तालुका - आ. अक्षय कर्डिले (विखे गट), कोपरगाव - बिपिन कोल्हे (थोरात गट), नेवासा - माजी मंत्री शंकरराव गडाख ( थोरात गट), पाथर्डी - आ. मोनिकाताई राजळे (थोरात गट), राहाता - माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील (विखे गट), संगमनेर - रणजितसिंह देशमुख (थोरात गट), शेवगाव - माजी जिल्हा परिषद अध्यक्षा राजश्रीताई घुले (थोरात गट) व श्रीगोंदा - दत्ता पानसरे (विखे गट). बिगर शेती संस्था मतदार संघ: सचिन जगताप (विखे गट)

------------------------------------

**यांच्यात होणार लढती**

सोसायटी मतदार संघ: पारनेर - खासदार निलेश लंके व राहुल शिंदे, अकोले - आ. डॉ. किरण लहामटे व संजीवनी शिंदे, कर्जत - तुषार पिसाळ व ज्योती शिंदे, राहुरी - आ. प्राजक्त तनपुरे व सत्यजित कदम. शेतीपूरक मतदार संघ - आ. आशुतोष काळे व सुधीर म्हस्के.. महिला राखीव (दोन जागा) मतदार संघ - हर्षदा काकडे, पुष्पा गायकवाड, मंजुषा गुंड, अनुराधा नागवडे, सुवर्णा पाचपुते, संध्या महांडुळे व संगीता वाघ, अनुसूचित जाती जमाती मतदार संघ - माजी आमदार वैभव पिचड व प्रशांत लोखंडे. इतर मागासवर्ग - ओबीसी मतदार संघ - शिवदास गुंजाळ, कारभारी जावळे, जालिंदर वाकचौरे, कडूघचंद शेटे व आजिनाथ हजारे. भटके विमुक्त मतदार संघ - सुभाष गिते, ऋषिकेश ढाकणे व गणपतराव सांगळे

# सैन्यभरती फसवणूक प्रकरण आर्थिक गुन्हे शाखेकडे

## बनावट नियुक्तीपत्रे आणि निवडीचे ई-मेल पाठविल्याचा प्रकार

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२२, अहिल्यानगर :** सैन्यदलात नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून तरूणांची लाखो रूपयांची फसवणूक केल्याचे प्रकरण गंभीर बनले असून, या गुन्ह्याचा तपास आता आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला आहे. फसवणूक झालेल्या तरूणांची संख्या तसेच फसवणुकीची रक्कम वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी याबाबतचे आदेश दिले आहेत. या प्रकरणात आतापर्यंत दोघा तरूणांची २३ लाख ३८ हजार ३७८ रूपयांची फसवणूक झाल्याचे समोर आले आहे.

तरूणांकडून लाखो रूपये उकळल्यानंतर त्यांना बनावट नियुक्तीपत्रे आणि निवडीचे ई-मेल पाठविण्यात आल्याचेही फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी ऋषिकेश महादेव गोल्हार (वय २५, रा. भाळवणी, ता. पारनेर) यांनी १७ ऑक्टोबर रोजी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यातील संशयित आरोपी गणेश कारभारी थोपटे (रा. टाकळी ढोकेश्वर, ता. पारनेर) याला पोलिसांनी अटक केली आहे. तर दुसरा संशयित अक्षय उत्तम हरणे (रा. नांदेड) याचा शोध सुरू आहे. गुन्ह्याची व्याप्ती वाढण्याची शक्यता असल्याने पुढील तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आला आहे. गोल्हार यांना सैन्यदलात नोकरी करण्याची इच्छा असल्याने ते भरतीसाठी सराव करीत होते.

याचदरम्यान त्यांचा मित्र सौरव जन्हाड याने गणेश थोपटे हा पुणे येथे एअर फोर्समध्ये नोकरीला असून, तो सैन्यदलात नोकरी मिळवून देऊ शकतो, असे गोल्हार यांना सांगितले. त्यानंतर गोल्हार यांनी थोपटे याच्याशी संपर्क साधला. आमिषातून गोल्हार यांच्याकडून १३ लाख २९ हजार ३७८ रूपये त्यांचा मित्र अंकेश अशोक दावभट (वय २४, रा. पाडळी कान्हूर, ता. पारनेर) यालाही आसाम रायफल्समध्ये नोकरी देण्याचे आमिष दाखवून आठ लाख १० हजार रुपयांचा गंडा घातला.

**अनेक तरुणांची फसवणूक?**

अशाच प्रकारे आणखी काही तरूणांची फसवणूक झाली असण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे या प्रकरणातील फसवणूक झालेल्या व्यक्तींची संख्या आणि नुकसानीचा आकडा वाढू शकतो. याच पार्श्वभूमीवर अधीक्षक सुदर्शन यांनी गुन्हा आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्याचे आदेश दिले. त्यानुसार तोफखाना पोलीसांनी पुढील तपासासाठी गुन्हा आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग केला आहे. आता या प्रकरणातील आर्थिक व्यवहार, संशयितांची भूमिका आणि आणखी कोणी या फसवणुकीला बळी पडले आहे का, आणखी आरोपी आहेत का, याचा तपास केला जाणार आहे.

# 'पिक पाहणी' केली का? ; नाही

## नाहीतर मदतीपासून वंचित राहण्याची शक्यता; पीक पाहणी ठरणार महत्त्वाची

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२२, अहिल्यानगर :** राज्यातील दुष्काळजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील खरीप पिकांची ऑनलाइन पीक पाहणी नोंद वेळेत करणे अत्यंत महत्त्वाचे ठरत आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे नुकसान, पीक विमा योजनेतील लाभ तसेच शासनाकडून वेळोवेळी जाहीर होणाऱ्या विविध मदती व सवलतींचा लाभ घेण्यासाठी पीक पाहणीची नोंद महत्त्वाचा आधार ठरणार आहे. त्यामुळे 'पीक पाहणी केली का?' हा प्रश्न आता केवळ नोंदीपुरता न राहता शेतकऱ्यांच्या आर्थिक मदतीशी थेट जोडला गेला आहे.

दुष्काळ, पावसातील अनियमितता, पिकांचे नुकसान आणि वाढता उत्पादन खर्च यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. अशा परिस्थितीत शासनाकडून नैसर्गिक आपत्तीअंतर्गत मिळणारे अनुदान, पीकविमा नुकसानभरपाई किंवा अन्य शासकीय मदत मिळण्यासाठी संबंधित शेतातील पिकांची अधिकृत नोंद असणे गरजेचे आहे. त्यामुळे पीक पाहणीकडे दुर्लक्ष केल्यास भविष्यात नुकसान भरपाईच्या प्रक्रियेत अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे.

शेतकऱ्यांनी आपल्या शेतात प्रत्यक्ष कोणते पीक घेतले आहे, याची नोंद 'ई पीक पाहणी'च्या माध्यमातून केली जाते. नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान झाल्यानंतर प्रशासनाकडून पंचनामा, नुकसान नोंद आणि मदतीची प्रक्रिया राबविताना ही माहिती महत्त्वाची ठरते. त्यामुळे 'पीक घेतले, पण नोंद केली नाही' अशी परिस्थिती शेतकऱ्यांसाठी अडचणीची ठरू शकते.

अहिल्यानगर जिल्ह्यात खरीप हंगामात मोठ्या प्रमाणावर विविध पिकांची लागवड केली जाते. पावसाच्या लहरीपणाचा आणि बदलत्या हवामानाचा शेतीवर परिणाम होत असताना पिकांचे नुकसान झाल्यास शासकीय मदत व पीकविमा मिळणे शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे आहे. त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याने आपल्या शेतातील खरीप पिकाची नोंद झाली आहे की नाही, याची खात्री करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांनी शेतातील खरीप पिकांची पीक पाहणी नोंद पूर्ण करावी. नोंद करताना पीक व क्षेत्राची माहिती अचूक भरावी. पीक पाहणीची नोंद झाल्यानंतर उपलब्ध पावती / नोंद सुरक्षित ठेवावी. नोंदीमध्ये त्रुटी असल्यास संबंधित महसूल यंत्रणेकडे तातडीने संपर्क साधावा.

भविष्यातील नैसर्गिक आपत्ती अनुदान, पीकविमा व शासकीय मदतीसाठी नोंद महत्त्वाची असल्याने दुर्लक्ष करू नये. शासनाकडून मदतीची घोषणा होण्याची वाट पाहण्यापेक्षा त्यासाठी आवश्यक असलेली कागदोपत्री प्रक्रिया पूर्ण ठेवणे शेतकऱ्यांच्या हिताचे आहे. त्यामुळे 'पीक पाहणी' आजच पूर्ण करा आणि भविष्यातील मदतीचा मार्ग अडथळामुक्त ठेवा, असे आवाहन महसूल विभागाकडून करण्यात आले आहे.

# पालम येथे उद्या मोफत कॅन्सर तपासणी शिबिर

**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.२२, पालम (परभणी) :** बदलत्या जीवनशैलीमुळे कॅन्सर अर्थात कर्करोगाच्या आजाराचे प्रमाण वाढत असताना ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये कर्करोगाबाबत जनजागृती करण्याबरोबरच आजाराचे वेळेत निदान व उपचार मिळावेत, या उद्देशाने पालम येथे शनिवार, दि.२४ ऑक्टोबर रोजी मोफत कॅन्सर तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर नर्गिस दत्त मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटल, द प्राईड इंडिया 'स्पर्श', ग्रामीण रुग्णालय पालम आणि तालुका आरोग्य कार्यालय, पालम यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले आहे. शिबिराचे आयोजन सकाळी १० वाजता ग्रामीण रुग्णालय, पालम येथे करण्यात येणार असून, तपासणी पूर्णपणे मोफत असणार आहे.

कॅन्सरसारख्या गंभीर आजाराचे वेळेत निदान झाल्यास उपचार करणे अधिक सुलभ होते. मात्र ग्रामीण भागात अनेकदा आजाराची लक्षणे दुर्लक्षित केली जातात किंवा तपासणीसाठी विलंब होतो. ही बाब लक्षात घेऊन नागरिकांना त्यांच्या आरोग्याची तपासणी करून घेण्याची संधी या शिबिराच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आली आहे. शिबिरासाठी येणाऱ्या सर्व रुग्णांनी व नागरिकांनी आपले आधार कार्ड सोबत आणणे अनिवार्य असल्याचे आयोजकांनी कळविले आहे. दरम्यान, तालुक्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे (झक्ळ), समुदाय आरोग्य अधिकारी (उकज), आशा स्वयंसेविका तसेच आरोग्य सेवकांनी आपापल्या कार्यक्षेत्रात या शिबिराची व्यापक जनजागृती करून जास्तीत जास्त नागरिकांना सहभागी करून घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. कॅन्सरचे वेळेत निदान आणि योग्य उपचारासाठी नागरिकांनी या मोफत तपासणी शिबिराचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन द प्राईड इंडिया 'स्पर्श'चे प्रकल्प समन्वयक गणेश काकडे यांनी केले आहे.

# थोडक्यात बातम्या

## मिशन ऑलिम्पिक गेम्स असोसिएशनच्या वतीने तायक्वांदो खेळासाठी संघटक म्हणून निवड



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२२, मुंबई :** तायक्वांदो खेळाच्या प्रचार व प्रसारासाठी आणि खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी मिशन ऑलिम्पिक गेम्स असोसिएशन यांच्या वतीने तायक्वांदो खेळासाठी संघटक म्हणून सुनिल मनोहर साखरकर यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीमुळे तायक्वांदो क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. तायक्वांदो खेळाच्या माध्यमातून अनेक खेळाडूंना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर संधी मिळावी, खेळाडूंच्या कौशल्याला योग्य व्यासपीठ मिळावे तसेच या खेळाचा अधिकाधिक प्रचार व प्रसार व्हावा,या उद्देशाने संघटनात्मक पातळीवर काम करण्याचा मानस आहे.

मिशन ऑलिम्पिक गेम्स असोसिएशनच्या सदस्यत्व प्रमाणपत्राद्वारे संबंधित नियुक्तीला मान्यता देण्यात आली असून, महाराष्ट्र व संपूर्ण भारतात तायक्वांदो खेळासाठी सुनिल साखरकर यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीमुळे तायक्वांदो खेळाच्या विकासासाठी अधिक जोमाने कार्य करण्याची संधी मिळणार असून, खेळाडू आणि पालक, प्रशिक्षकांनी या निवडीबद्दल अभिनंदन केले आहे.

## कामठीत धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त हजारोंनी घेतला भोजनदानाचा लाभ




**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२२, नागपूर :** धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त कामठी येथे भव्य भोजनदानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात तथागत भगवान बुद्ध तसेच भारतरत्न व संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना पुष्प अर्पण करून करण्यात आली. कामठी शहर काँग्रेस सेवादलाचे अध्यक्ष व सामाजिक कार्यकर्ते, समाजरत्न डॉ.सुनील वाघमारे यांच्या प्रमुख उपस्थितीत राबविण्यात आला. भोजनदान कार्यक्रमात विपिन गायकवाड, रवीकुमार चंद्रीकापुरे, शेखर बनसोड, पंकज खोब्रागडे, वंदना बनसोड, सुशिला वाघमारे, रमेश पवणीकर आदीसह अनेकांनी सहकार्य केले. याप्रसंगी भोजनदान कार्यक्रमात शेकडो उपासक, उपासिकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

## दहिवली येथील अंगणवाडीत 'पोलिस मित्र सुरक्षा परिषदेकडून शैक्षणिक साहित्याचे वाटप



**अक्षराज : जयेश जाधव**

**दि.२२, कर्जत (रायगड) :** सामाजिक बांधिलकी जपत 'ऑल पोलिस मित्र सुरक्षा परिषद ऑफ इंडिया, नवी दिल्ली' या संघटनेच्या माध्यमातून कर्जत तालुक्यातील दहिवली येथील अंगणवाडी शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक व उपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमांतर्गत अंगणवाडी शाळेला सिलिंग फॅन व महापुरुषांची छायाचित्रे भेट देण्यात आली. तसेच लहान विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, बिस्किटे आणि केळी देऊन त्यांचा आनंद द्विगुणित करण्यात आला. या उपक्रमामुळे अंगणवाडीतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रोत्साहन मिळण्यास मदत झाली.

यावेळी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष ज्ञानेश्वर साळोखे, प्रदेशाध्यक्ष किशोर शितोळे आणि कोकण अध्यक्ष भानुदास पालकर उपस्थित होते. तसेच अंगणवाडी शिक्षिका, सेविका व कर्मचारीवर्ग यांची उपस्थिती होती.

## ताडोबात होणार वन्यजीवांसाठी पाणवठ्यांचे संवर्धन

### प्रथमच प्रायोगिक तत्वावर सेन्सर प्रणाली

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२२, चंद्रपूर :** ताडोबा-अंधीरी व्याघ्र प्रकल्प वन्यजीवांच्या पाणवठ्यांमधील पाण्याची पातळी नियंत्रित करण्यासाठी प्रायोगिक तत्वावर सेन्सर-आधारित प्रणाली सुरु करण्यात येणार आहे. या यंत्रणेद्वारे पाण्याची पातळी निर्धारित मर्यादेपेक्षा कमी झाल्यास पंप आपोआप सुरु होतो आणि पाण्याची पातळी निर्धारित मर्यादेपेक्षा वाढल्यास पंप आपोआप बंद होतो. यामुळे पाण्याचा ओव्हरफ्लो रोखण्यास व पंप अनावश्यक चालणे टाळण्यास मदत होणार असल्याने वन्यजीवांसाठी पाणवठ्यांमधील पाण्याचे संवर्धन करणे आता शक्य होणार आहे. ताडोबा- अंधीरी व्याघ्र प्रकल्पात सुमारे १३० नैसर्गिक जलस्त्रोत आणि ३५० कृत्रिम पाणवठे आहेत. यापैकी अनेक कृत्रिम पाणवठ्यांमध्ये पाणीपुरवठ्यासाठी सौरऊर्जेवर चालणाऱ्या यंत्रणा कार्यरत आहेत. गेल्या उन्हाळ्यात तीव्र उन्हाचा तडाखा असूनही या पाणवठ्यांमध्ये पाणी भरण्यासाठी टँकरची आवश्यकता भासली नाही. तथापि, अनेकदा सौरऊर्जेवर चालणारे हे पंप सतत सुरु राहतात. त्यामुळे पाण्याची अपव्यय होतो. ओव्हरफ्लो होणाऱ्या पाण्यांपैकी काही पाणी वन्यप्राण्यांसाठी लोळण्यासाठी उपयुक्त ठरत असले तरी पंप बंद करण्यासाठी प्रत्यक्ष हस्तक्षेप करावा लागतो. मात्र, असे करताना वन्यप्राण्यांच्या हल्ल्यांचा धोका संभवतो आणि ही पध्दत फारशी कार्यक्षमही नाही.

नवीन-सेन्सर आधारित यंत्रणेनुळे पाणी व्यवस्थापन अधिक कार्यक्षम करण्यासाठी आणखी एक उपाय उपलब्ध झाला आहे. यामुळे पाण्याचा अपव्यय कमी करणे, भूजलाचा अनावश्यक उपसा मर्यादित करणे आणि पंपावर सतत लक्ष ठेवण्यासाठी तसेच ते चालू- बंद करण्यासाठी कर्मचाऱ्याची आवश्यकता कमी करणे शक्य होईल. ही यंत्रणा पंपाशी जोडलेल्या पातळी संवेदक (लेव्हल सेन्सर), नियंत्रक (कंट्रोलर), आणि रिले यांच्या साहाय्याने कार्य करते. पाण्याची पातळी पूर्वनिर्धारित खालच्या मर्यादेपेक्षा कमी झाल्यावर पंर आपोआप सुरु होतो. पाण्याची पातळी वरच्या निर्धारित मर्यादेपर्यंत पोहोचल्यावर पंप आपोआप बंद होतो.

**जलसंवर्धन आणखी बळकट : शुक्ला**

वन्यजीवांच्या पाणवठ्यांच्या व्यवस्थापनासाठी सेन्सर-आधारित प्रणाली प्रथमच सादर करण्यात येत आहे. या प्रणालीचा व्यापक वापर केल्यास जलसंवर्धन अधिक बळकट होईल. दुष्काळी परिस्थितीतही वन्यजीवांसाठी पाण्याची उपलब्धतता सुनिश्चित करण्यास व्यवस्थापनाला मदत होईल आणि भूजल संवर्धनालाही हातभार लागेल, असे ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक प्रभुनाथ शुक्ला यांनी सांगितले.